डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी

जा.क्र./कृविके/८२६ /२०१९ दिनांक :— 8 MAR 2019

## जाहीर नोटीस

**विषय :** कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील विविध विभागातील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत....

कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील खालील विभागातील दि. **०१/०४/२०१९** ते दि. **३०/०६/२०१९** या कालावधीतील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी इच्छूक ठेकेदारांकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छूक ठेकेदारांनी ***मा. कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी*** या नावे आपले दरपत्रक **दि. २२/०३/२०१९** पर्यंत या कार्यालयास सादर करावे. करावयाच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विभाग | करावयाच्या कामाचा तपशील | आवश्यक मजूर |
|---|---|---|---|
| ०१ | प्रक्षेत्र तसेच नर्सरी | सका. ०८ ते सायं. ०४ , सायं. ०४ ते रात्री १२ व रात्री १२ ते सका. ०८ — या वेळेत प्रक्षेत्राची राखण करणे तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०२ | प्रक्षेत्र | ट्रॅक्टरने नागंरणी करून रोटाव्हेटर मारणे, शेणखत ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरून प्रक्षेत्रावर आणणे, भात, नागली, भुईमुग, आंबा बाटा तसेच इतर पिकांची पेरणी करणे. तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०३ | प्रक्षेत्र | भात, नागली, भुईमुग, आंबा बाटा पेरणीसाठी गादी वाफे तयार करणे, काजु बी गोळा करणे, ती धुवून वाळविणे व पॅकींग करणे, काजु बी रूजत घालणे, प्रक्षेत्राची साफसफाई करणे, तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |
| ०४ | नर्सरी | कलमे/रोपे इ. ना पाणी घालणे, फवारणी/आळवणी करणे, फूट काढणे, तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०२ |
| ०५ | नर्सरी | काजु, कोकम कलमे बांधणी करीता मातृवृक्ष बागेमधील झाडांवर डिफॉलीएशन करणे, कलम काडया काढणे, कलमे बांधणे. तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०३ |

**दरपत्रके सादर करण्यासंबंधीच्या अटी व शर्ती :—**

- दिलेली कामे कार्यालयीन वेळेतच पूर्ण करावयाचे आहे. ( सका. ०८ ते १२ व दुपारी ०२ ते ०५.४५ )
- दरपत्रकात प्रती मजूर प्रती दिवस या प्रमाणे मजूरीचा दर नमूद करावा.
- ठेका कामासंबंधीच्या सविस्तर अटी व शर्ती या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावणेत आल्या आहेत. अधिक माहितीसाठी श्री जे. जे. दुबळे (प्रक्षेत्र व्यवस्थापक) यांचेशी कामाचे दिवशी संपर्क साधावा (सका. ०८ ते १२ व दुपारी ०२ ते ०५.४५ )
- कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे हक्क या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

**कार्यक्रम समन्वयक,**
कृषि विज्ञान केंद्र, देवधे,लांजा

**प्रत प्रसिध्दीसाठी रवाना :—**

१. कायार्लयीन नोटीस बोर्ड
२. कृषि तंत्र विद्यालय, देवधे ( लांजा )
३. ग्रामपंचायत कार्यालय, देवधे
४. ग्रामपंचायत कार्यालय, गवाणे
५. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉबासाकोकृवि, दापोली.